नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 10/11/2021 (बुधवार)
(सायंकाळ)

---

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. काटोल :- अंतर्गत 5 कि. मी. अंतरावरील मौजा कोळंबी येथे दिनांक 09/11/2021 चे 11.15 वा. ते 11.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे- प्रकाश विठ्ठलराव भुरसे वय 39 वर्ष रा. पारडसिंगा हा त्याचे शेतात गेला असता त्याने आपली एमएच- 40/ ऐऐ- 8322 क्रमांकाची मोटरसायकल रोडवर उभी करून ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची किंमती 25,000/-रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरून भेन्डे मो क 9923193642 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. सावनेर :- अंतर्गत पहलेपार सावनेर येथे दिनांक 07/11/2021 चे 20.00 वा. दरम्यान सौ.दिव्याणी हर्षदिप गौरखेडे वय 21 वर्ष रा. पहलेपार सावनेर वार्ड कं. 17 ह.मु. गुजरखेडी व आरोपी क. 1) हर्षदिप देवानंद गौरखेडे हा फिर्यादीचा पती असुन आरोपी कं. 2 अर्चना देवानंद गौरखेडे 3) देवानंद गौरखेडे सर्व रा. पहलेपार सावनेर ता.सावनेर हे सासु सासरे आहेत. फिर्यादी हिला मुलगी झाली या कारणावरून आरोपीतांनी संगणमत करून तिला शिवीगाळ करून फिर्यादीचे डोक्यावर लाकडी काडीने मारून जखमी केले व पुन्हा मारहाण करण्याची धमकी दिली. फिर्यादी हि पायदळ जात असतांना तिला आरोपी कं. 1 ने जबरदस्तीने मोटरसायकल वर बसुन मोटरसायकल आडवी तिडवी चालवुन फिर्यादीला खाली पाडुन मोटरसायकल घेवुन पडुन गेला. फिर्यादी आई चे घरी माहेरी गुजरखेडी येथे राहण्यास गेली यानंतर तिने दिनांक 09/11/2021 रोजी पोलीस स्टेशन सावनेर येथे येवुन रिपोर्ट दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 324,504,506,34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार देवशंकर गुप्ता हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर